**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
स.न.८३२ ए. फायनल प्लॉट नं. १७८, १७९.
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४.
फोन नं. ०२० २५७०५००० ईमेल secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/ 1679
राज्य मंडळ, पुणे ४११ ००४
दि. 17 / 04 /२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय:**- अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत...

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३(मदत-१),दि. १० ऑक्टोबर,२०२५
२) शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३, दि. ०९ ऑक्टोबर,२०२५
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र. ४७/एसडी -५, दि. ०१ ऑगस्ट, २०१९
४)शा. शुद्धीपत्रक क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी -५, दि. ०३/०२/२०२०
५)शा. नि.क्र. एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि. १८/१०/१९९३

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की ,

१. **संदर्भिय** क्र.३ व ४ च्या शासन निर्णयानुसार, अवर्षणग्रस्त भागातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या आकारण्यात आलेल्या, संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्यमंडळ स्तरावरून, नियमित विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये NEFT/RTGS द्वारे करण्यात येणार आहे.
२. सन २०२५-२६ मध्ये २९ जिल्ह्यातील ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित असे एकूण २८२ तालुक्यातील , इ.१० वी व इ. १२ वी च्या या योजनेस पात्र असलेल्या, नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.
३. राज्यमंडळाने 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६' मधील प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी साठी मंडळाच्या संकेतस्थळावर शाळा महाविद्यालयांनी आपल्या लॉगइन -पासवर्ड चा उपयोग करून लॉगइन करावे. अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Option तेथे उपलब्ध होईल. सदर माहिती भरण्याकरीता **सोमवार दि. २०/०४/२०२६ ते शनिवार दि. २/०५/२०२६** हा कालावधी देण्यात येत आहे.
४. राज्यमंडळाने उपलब्ध केलेल्या माहितीमध्ये नियमित विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, विद्यार्थ्याचे नाव , बँक खाते क्रमांक, बँक आय एफ एस सी कोड , आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करून दिली आहे.
५. राज्यमंडळाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या पुढेच पात्र (Qualified ) रकाना उपलब्ध केला असून, त्यामध्ये (Qualified ) असा शेरा संबंधित माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद करावयाचा आहे.
६. पात्र विद्यार्थी निश्चित करताना संदर्भिय क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद पात्रता निकष आणि सन २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अंशतः बाधित /पूर्णतः बाधित तालुक्यांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

७. अंशतः बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळांनाच ही योजना लागू आहे . त्यामुळे अंशतः बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळामधील विद्यार्थ्यांचीच माहिती भरावी .
८. पात्र नियमित लाभार्थ्यांना उपरोक्त संदर्भिय क्र. ३ व ४ च्या शासन निर्णयानुसार, राज्यमंडळ स्तरावरून शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा NEFT/RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या /पालकांच्या आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या आधार संलग्न खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.
९. सर्व विभागीय मंडळानी आपल्या स्तरावरून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना माहिती भरण्यासाठी त्वरित कळवावे.

(डॉ.दिपक माळी )
सचिव ,राज्यमंडळ
पुणे -०४

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यबाहीसाठी :- .

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन ,मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण ), महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. श्रीम. पल्लवी बच्छाव , कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग .
४. मा.शिक्षण संचालक (योजना ), मध्यवर्ती इमारत , पुणे ४११ ००१.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर /अमरावती/नाशिक/लातूर/कोल्हापूर /बृहन्मुंबई
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),सर्व जिल्हे

यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळांना सादर करावा.

पत्र क्र. अविमं/लेखा/ 170
दि. 20.04.2026

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व
कनिष्ठ महाविद्यालय,अमरावती विभाग,
अमरावती.

उपरोक्त प्रमाणे मा.सचिव,राज्य मंडळ पुणे यांनी कळविल्यानुसार,अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पुर्णतःबाधित तालुक्यातील इ.१०वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / फी ची प्रतिपुर्ती मिळणेस्तव सदर पत्रामध्ये नमुद असल्याप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करावी.

करीता माहितीस्तव कळविण्यात येत आहे.

S.V.Salunke 20.04.2026
विभागीय सचिवा करीता
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती